**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१**

**मी शपथेवर खरे सांगते की,**

**नाव - भावना योगेश सदावर्ते,**

**वय** - ३१ वर्ष, **कामधंदा** - शेती,

**रा.** कवडशी, ता. व जिल्हा भंडारा.

**सरतपास– श्रीमती चोपडे सरकारी वकील.**

**१.** मी आरोपीला ओळखते. घटना दिनांक १५.०३.२०२४ रोजी कवडशी येथील पिंपरी पुनर्वसन या रोडवर सकाळी ११.०० ते ११.३० वाजेच्या सुमारास घडली होती. मी गायीसाठी आमच्या रस्त्याला लागून असलेल्या बांधीमधून चारा कापत होती. आरोपी अश्वीन पांढ-या अॅक्टीव्हा स्कुटीने आला आणि मला मादरचोद अशी शिवीगाळी केली. मी बांधीतून बाहेर निघून त्याला कशाला शिवीगाळ करत आहे असे बोलली असता तो मला शिवीगाळी करुन मी तुझी बदनामी करतो असे म्हणून त्याने माझ्या छातीला हात लावून माझी छेडखानी केली. त्यामुळे मी ओरडली असता माझे पती दुस-या बांधीतून बाहेर आले. त्यांनी आरोपीला तू माझ्या पत्नीला का शिवीगाळी करत आहे असे म्हटले असता तो आम्हाला तुम्ही दोघेही चला, तुम्हाला नागडे करुन चौकात मारतो, तुम्ही माझे काही करु शकत नाही अशी धमकी दिली. आरोपीने मला व माझ्या माझ्या पतीला मारायला सुरुवात केली.

२. आम्ही रस्त्यावरुन जाणा-या एका मुलाची गाडी घेतली व त्या गाडीने पोलीस स्टेशनला जाऊन रिपोर्ट दिली. आता मला अभिलेखावरील सदर रिपोर्ट व पहिली छापील खबर दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.पी.१६ व १७** देण्यात येते. पोलीस घटनास्थळावर आले होते व त्यांनी पंचनामा तयार केला होता. मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते. पोलीस मला बयान देण्याकरीता पोलीस न्यायालयात घेऊन गेले होते. (सदर बयानाचा सिलबंद लिफाफा सरकारी वकिल, आरोपी व साक्षीदाराच्या उपस्थितीत न्यायालयासमक्ष फोडण्यात आला.) आता मला अभिलेखावरील सदर बयान दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी.१८** देण्यात येते. मी आरोपीला ओळखते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी हजर. आरोपीने दिलेला तहकुबीचा अर्ज नि.क्र.१४ त्यावरील नमुद कारणांमुळे नामंजुर करण्यात आला आहे. आरोपीला उलटतपासाची संधी दिली असता त्याने नाकारली. सबब, आरोपीतर्फे उलटतपास नाहीचा आदेश पारित.**

समक्ष, श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by SOYANKE SONALI LAXMAN
Date: 2025.11.28 05:38:21 +0530

भंडारा. (सो. ल. सोयंके)

दिनांकः २८/११/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

भंडारा.